# प्रकरण ३२ :- केंद्रसरकार

## (1) कार्यकारी मंडळ :-

### I) राष्ट्रपती :-

1) प्रस्तावना :-

भारतामध्ये संसदीय लोकशाही शासनव्यवस्था अस्तित्वात आहे. संसदीय शासनव्यवस्थेमध्ये शासनाचे दोन प्रमुख असतात. एक वास्तविक प्रमुख आणि नाममात्र प्रमुख. नाममात्र प्रमुख म्हणून राष्ट्रपतींचा, वास्तविक प्रमुख म्हणून पंतप्रधानांचा उल्लेख केला जातो. राष्ट्रपती हे भारताचे राज्यप्रमुख असून सर्व कारभार त्यांच्या नावाने चालविला जातो. भारतात राष्ट्रपतींचे पद अतिशय मानाचे, सन्मानाचे व प्रतिष्ठेचे आहे. राष्ट्रपती भारताचे पहिले नागरीक असून ते देशाची एकता एकात्मता व अखंडता याचे प्रतिक असतात. तसेच ते तिन्ही ही सेनादलाचे सरसेनापती, कार्यकारी मंडळाचे प्रमुख, देशाचे प्रमुख आहेत. संविधानाच्या कलम 52 ते 62 मध्ये राष्ट्रपती पदाची तरतूद करण्यात आलेली आहे. कलम 52 नुसार भारताचा एक राष्ट्रपती असेल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. भारताने लोकशाही बरोबर गणराज्याचा स्विकार केला असल्यामुळे निर्वाचित राष्ट्रप्रमुखाची व्यवस्था भारतीय संविधानामध्ये करण्यात आलेली आहे.

2) रचना :-

(1) पात्रता :-

1) तो भारताचा नागरीक असावा.
2) त्याचे वय 35 वर्ष पूर्ण झालेले असावे.
3) तो लोकसभा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा.

Scanned with CamScanner

११,१८६

५) तो सरकारी नोकरदार नसावा. किंवा सरकारची आर्थिक प्राप्ती मिळणारा नसावा.

② सुचक व अनुमोदक :-

राष्ट्रपतीपदासाठी आवेदन पत्र (निवडणूकीचा अर्ज) भरताना 50 सुचक व 50 अनुमोदकाची आवश्यकता असते. राष्ट्रपतीच्या निवडणूकीत ज्यांना मतदानाचा हक्क आहे. तेच सुचक किंवा अनुमोदक होत असतात.

③ अनामत रक्कम :-

राष्ट्रपती पदाची निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीला १९९७ पासून 15,000 रु अनामत रक्कम भरावी लागते. व ही रक्कम निवडणूकीमध्ये एकूण मतांच्या $\frac{1}{6}$ पेक्षा जास्त मते प्राप्त झाल्यास परत मिळते, अन्यथा ती रक्कम जप्त होते.

④ राष्ट्रपती पदाची निवडणूक :-

राष्ट्रपतीची निवड कलम ५५ नुसार नागरिकांतर्फे अप्रत्यक्षपणे गुप्त मतदान व एकलसंक्रमण पद्धतीने होते. राष्ट्रपतीच्या निवडणूकीच्या वेळी एका निर्वाचन मंडळाची स्थापना केली जाते. निर्वाचन मंडळामध्ये लोकसभा राज्यसभा व घटकराज्यातील विधानसभेच्या निर्वाचीत सदस्यांचा समावेश होतो. राष्ट्रपतीच्या निवडणूकीत यांनाच मतदान करण्याचा अधिकार आहे.

राष्ट्रपतीद्वारे लोकसभेमध्ये दोन व राज्यसभेत

12 सदस्य नेमले जातात. त्यांना राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार नाही. तसेच राज्यपालांनी विधानसभेवर मध्ये नेमलेले सदस्य आणि विधानपरिषदेचे सदस्य राष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करत नाहीत. केंद्रशासित प्रदेशातील विधानसभेच्या सदस्यालाही मतदानाचा अधिकार नसतो.

राष्ट्रपतीच्या निवडणूकीमध्ये ज्यांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे, त्या मतदारांच्या मताची किंमत / मुल्य ठरविण्यासाठी घटनेमध्ये दोन सुत्र सांगण्यात आलेले आहेत. त्या सुत्रानुसार त्यांच्या मताची किंमत निश्चित केली आहे.

① विधानसभेच्या निर्वाचीत सदस्याची किंमत = $\dfrac{\text{त्या घटकराज्याची लोकसंख्या}}{\text{त्या घटकराज्यातील निर्वाचीत सदस्यांची संख्या}} \times \dfrac{1}{1000}$

② संसदेच्या निर्वाचीत सदस्यांच्या मताचे मुल्य = $\dfrac{\text{सर्व घटकराज्यातील विधानसभेच्या प्राप्त झालेल्या एकूण मताच्या मुल्यांची बेरिज}}{\text{लोकसभा व राज्यसभेतील निर्वाचीत सदस्यांची बेरीज}}$

या सुत्राचा वापर करून विधानसभा, लोकसभा व राज्यसभेच्या निर्वाचीत सदस्याची किंमत निश्चित केली जाते. तसेच मतदानानंतर राष्ट्रपती म्हणून निवडून येण्यासाठी किती मताची आवश्यकता असते, हे काढले जाते त्यास कोटा असे म्हणतात. तो कोटा निश्चित करण्यासाठी एक सुत्र सांगण्यात आले आहे.

राष्ट्रपती म्हणून निवडूण येण्यासाठी आवश्यक मते / कोटा = $\dfrac{\text{एकूण मताची संख्या}}{\text{राष्ट्रपती पदाची संख्या}} + 1$

(5)
मतदान :-

लोकसभा, राज्यसभा व विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांच्या मताची किंमत निश्चित केल्यानंतर मतदान घेतले जाते. एकलसंक्रमणीय मतदान पद्धतीत फुलीचा ठसा / बटन दाबून मतदान केले जात नाही, तर उमेदवारांच्या नावाची एक मतपत्रिका मतदाराला दिली जाते. त्या मतपत्रिकेतील उमेदवारांच्या नावासमोर पसंतीक्रम देवून मतदान केले जाते. व त्या मतपत्रिकेच्या एका बाजूस त्या मतदारांच्या मतांची किंमत लिहिलेली असते. त्या किमतीचा उपयोग मतमोजणी करताना होतो. पसंतीक्रमांक देताना मतदारांच्या इच्छेनुसार उमेदवाराच्या समोर एकाला, दोघांना / सर्वच उमेदवारांना अनुक्रमे पसंतीक्रम देता येतो. कमीत कमी व जास्तीत जास्त निवडणूकीत जेवढे उमेदवार उभे आहेत तेवढ्यांना पसंतीक्रमांक देता येतो.

(6) मतमोजणी :-

मतमोजणी करताना निवडून येण्यासाठी किती मतांची आवश्यकता असते तो कोटा निश्चित केला जातो. पहिल्यांदा पहिल्या पसंतीक्रमाची मते मोजली जातात. ज्या उमेदवारास अर्ध्यापेक्षा जास्त मते मिळतात / जो कोटा पूर्ण करतो तो विजयी होतो. यास मतमोजणीची पहिली फेरी असे म्हणतात.

मतमोजणीच्या पहिल्या फेरीमध्ये कोणत्याहि उमेदवाराला अर्ध्यापेक्षा जास्त मते मिळाले नसल्यास कोटा पूर्ण झाला नसल्यास मतमोजणीची दूसरी फेरी केली जाते. दुसऱ्या फेरीमध्ये पहिल्या फेरीमध्ये ज्या

उमेदवारास सर्वात कमी मते मिळाले आहेत. तो उमेदवार दुसऱ्या फेरीमध्ये बाद होतो. बाद होणाऱ्या उमेदवाराला . ज्यांनी पहिल्या पसंती क्रमांक दिला त्या प्रत्येक मतदारांनी आपल्या पसंतीचा दुसरा क्रमांक ज्या उमेदवाराला दिला. त्या उमेदवाराला ती मतपत्रिका पूर्ण मुल्यासह संक्रमित केली जाते. व दुसरा पसंती क्रमांक असे दिलेला नसेल तर ती मतपत्रिका बाद होते. दुसऱ्या फेरीमध्ये ज्या उमेदवाराचा कोटा पूर्ण होतो तो विजयी होतो परंतु दुसऱ्या फेरीमध्ये हो कोटा पूर्ण झाला नाही तर मतमोजणीची तिसरी फेरी होते. कोटा पूर्ण होईपर्यंत मतमोजणीची फेरी चालवावी. भारतामध्ये आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्या फेरीमध्ये विजय झालेला आहे. फक्त 1967 मध्ये राष्ट्रपती म्हणून व्ही. व्ही गिरी निवडून आले त्यावेळी दुसरी फेरी करावी लागली.

⑦ <u>शपथविधी</u> :-

राष्ट्रपतीच्या निवडणूकीमध्ये विजय प्राप्त केलेल्या उमेदवारास राष्ट्रपती म्हणून पदाची शपथ सर्वोच्च <u>सर्वोच्च</u> <u>न्यायालयाचा</u> <u>मुख्य</u> <u>न्यायधीश</u> देत असतो.

⑧ <u>कार्यकाल</u> :-

राष्ट्रपतीचा कार्यकाल 5 वर्षाचा असतो कार्यकाल पूर्ण होण्याच्या आधी स्वेच्छेनुसार <u>उपराष्ट्रपतीकडे</u> राजीनामा देण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. उपराष्ट्रपती राजीनामा लागलीच <u>लोकसभेच्या</u> <u>सभापतीकडे</u> पाठवित असतो

⑨ महाभियोगाचा खटला :-

संविधानाच्या कलम 61 नुसार भारताच्या राष्ट्रपतीने एखादा गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला असेल तर महाभियोगाच्या खटल्याद्वारे त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे. राष्ट्रपतीवर महाभियोगाचा खटला चालवण्या अगोदर सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या $\frac{1}{4}$ सदस्यांनी आपल्या सहयासह 14 दिवस अगोदर लेखी सुचना राष्ट्रपतीला द्यावी लागते. 14 दिवसानंतरच सभागृहामध्ये चर्चा होते. एका सभागृहामध्ये आरोप लावला जातो व दुसऱ्या सभागृहात आरोपाची चौकशी केली जाते. यावेळी राष्ट्रपतीला बचावात्मक भाषण करण्याची संधी असते. दोन्ही सभागृहामध्ये $\frac{2}{3}$ बहुमताने तो ठराव मंजूर झाल्यास राष्ट्रपतीला पदच्युत व्हावे लागते. राज्यसभेमध्ये जेव्हा राष्ट्रपतीच्या महाभियोगाची चर्चा होते तेव्हा राज्यसभेचा सभापती म्हणून उपराष्ट्रपती कार्य करत नाही. तर उपराष्ट्रपती ऐवजी भारताचा सरन्यायाधिश राज्यसभेचा सभापती म्हणून कार्य करत असतो. राष्ट्रपतीपदाची जागा रिकामी झाल्यास 6 महिन्याच्या आत निवडणूका घेतल्या जातात तोपर्यंत उपराष्ट्रपती कार्यवाहक राष्ट्रपती म्हणून कार्य करतो.

⑩ वेतन व भत्ते :-

राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते ठरवण्याचा अधिकार संसदेला आहे. एकदा ठरलेले वेतन व भत्ते त्याच्या कालावधीत कमी केले जात नाहीत

सध्या 1 लाख 50 हजार रु करमुक्त वेतन दिले जाते. दिल्ली येथील निवासस्थानास राष्ट्रपती भवन या नावाने ओळखले जाते. याशिवाय राष्ट्रपतीला पेन्शन ही दिले जाते व इतर सुखसोई ही मोफतपणे दिल्या जातात

★ राष्ट्रपतीचे अधिकार व कार्य :-

① शासनविषयक / कार्यकारीविषयक अधिकार :-

भारताचा राष्ट्रपती हा संघराज्याच्या शासनाचा प्रमुख आहे. संपूर्ण देशाचा राज्यकारभार राष्ट्रपतीच्याच नावाने चालतो. सर्वोच्च शासक या नात्याने भारताच्या राष्ट्रपतीला शासनविषयक अधिकार प्राप्त झालेले आहेत.

1) पंतप्रधान, मंत्रीमंडळातील मंत्री सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायधीश, घटकराज्याचे राज्यपाल, राजदूत महान्यायवादी, कायदेशिर सल्लागार, महालेखापाल, रिझर्व्ह बँकेचा गर्व्हनर, केंद्रशासीत प्रदेशाचा chief कमिशनर, तीन्ही सैन्यदलातील तीन्ही मुख्याधिकारी, विविध आयोगाचे अध्यक्ष सदस्य यांची नेमणूक करणे.

2) सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायधिश सोडून इतर त्यांनी नेमलेल्या व्यक्तींना पदच्यूत करणे.

3) राष्ट्रपतीने नेमलेल्या पदावरील व्यक्तिच्या कार्यावर देखरेख नियंत्रण ठेवणे व त्यांना मार्गदर्शन करणे.

② कायदेविषयक अधिकार :-

भारताचा राष्ट्रपती हा कायदेमंडळाचा सदस्य नसतो. परंतू तो संसदेचा एक घटक किंवा एक भाग असतो. त्यामुळे राष्ट्रपतीला काही कायदेविषयक अधिकार प्राप्त झाले आहेत. या कायदेविषयक अधिकारामुळे

अधिकार

राष्ट्रपतीला कायदेमंडळाचे तिसरे सभागृह या नावाने ओळखले जाते. कायदेविषयक अधिकारात
1) संसदेचे अधिवेशन बोलावणे, स्थगित करणे, अधिवेशनाचा कालावधी कमी करणे किंवा जास्त करणे, संसदेचे जादा अधिवेशन बोलावणे, एखादया विधेयकाबाबत लोकसभा व राज्यसभेत मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशन बोलावणे. (अधिवेशनाबाबत)

संमती :-
2) संसदेने संमत केलेल्या विधेयकास राष्ट्रपतीची संमती आवश्यक असते. राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय कोणत्याही विधेयकाचे कायदयात रूपांतर होवू शकत नाही. राष्ट्रपतीला सामान्यविधेयकाला एक वेळा नकार देण्याचा किंवा वेटो (पॉवर) वापरण्याचा अधिकार आहे.

3) वटहुकूम :
संसदेचे अधिवेशन चालु नसतांना एखादया कायदयाचीगरज भासल्यास त्याबाबत राष्ट्रपतीला अध्यादेश व वटहुकूम काढण्याचा अधिकार आहे. नंतर अधिवेशन सुरू झाल्यास 6 आठवड्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते.

नेमणूकसंदर्भात :-
4) राज्यसभेमध्ये कला साहित्य विज्ञान व समाजसेवा क्षेत्रातील 12 सदस्य व लोकसभेमध्ये अँग्लोइंडियन जमातीचे 2 सदस्य नेमण्याचा अधिकार आहे.
5) संसदेच्या एका किंवा दोन्ही सभागृहाकडे विधेयक

किंवा इतर विधेयकाच्या बाबत संदेश पाठवण्याचा अधिकार आहे.

6) लोकसभेची मुदतपूर्व विसर्जन करण्याचा अधिकार आहे.

## ③ आर्थिक अधिकार :-

शासनाच्या प्रमुख या नात्याने भारताच्या राष्ट्रपतीस आर्थिक अधिकार ही प्राप्त झाली आहेत. त्यामध्ये

① राष्ट्राचा पैसा राष्ट्रपती व संसद यांच्या संमतीने खर्च केला जातो त्यामुळे तिजोरीची एक चावी राष्ट्रपतीकडे किंवा राष्ट्रपतीच्या हातात तर दुसरी चावी संसदेच्या हातामध्ये असते म्हटले जाते.

② धनविधेयक मांडण्यापूर्वी राष्ट्रपतीची संमती घ्यावी लागते.

③ दरवर्षीचे अंदाजपत्रक राष्ट्रपती अर्थमंत्र्याच्या मार्फत संसदेत सादर करतो.

④ संचित निधीवर राष्ट्रपतीचे नियंत्रण असते.

⑤ आकस्मित खर्चासाठी राष्ट्रपतीची परवानगी आवश्यक असते इ.

## ④ न्यायविषयक अधिकार :-

भारताच्या राष्ट्रपतीला सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नेमणूक करण्याचा अधिकार आहे. न्यायाधीशाचा कार्यकाल पूर्ण होण्या अगोदर स्वइच्छेनुसार त्याला राजीनामा द्यावयाचा असेल तर तो राष्ट्रपतीकडे

द्यावा लागतो. सर्वोच्च न्यायालयातील इतर न्यायाधि-शांची संख्या ठरवण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. कायद्याच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाकडून सल्ला घेण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयांनी गुन्हेगारांना दिले त्या शिक्षेमध्ये बदल करण्याचा / कमी करण्याचा / संपूर्ण माफ करण्याचा अधिकार ही राष्ट्रपतीला आहे.

5) परराष्ट्र विषयक अधिकार :-
परराष्ट्र मंत्री व परराष्ट्र वकिलांची नेमणूक करणे. परराष्ट्रातून भारतामध्ये आलेल्या राजदूतांचा स्विकार करणे. परराष्ट्राशी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक संबंध प्रस्थापित करणे. आंतरराष्ट्रीय संमेलन / परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणे किंवा आपला प्रतिनिधी पाठविणे.

6) सैन्यविषय / लष्करविषय अधिकार :
भारताचा राष्ट्रपती स्थल, वायू, व जल या तिन्ही सैन्यदलाचा सरसेनापती असतो. सरसेनापती या नात्याने तिन्ही ही सैन्यदलातील मुख्य सैन्य अधिकाऱ्याची नेमणूक करणे, युद्धाची घोषणा करणे युद्ध थांबविणे, युद्धाबाबत करार करणे, शस्त्रास्त्रांची निर्मिती किंवा साठा करणे, सैन्याची संख्या ठरविणे. इ. अनेक अधिकार व कार्य पार पाडावी लागतात.

7) आणिबाणी विषयक / संकटविषयक अधिकार :-

भारतीय संविधानाच्या १८व्या भागातील कलम 352, 356 व 360 नुसार भारताच्या राष्ट्रपतीला आणिबाणीचा अधिकार प्राप्त झाला आहे.

1) राष्ट्रीय आणिबाणी :-

कलम 352 नुसार ~~देशामध्ये युद्ध सुरू~~ एखादया दूसऱ्याने देशाने आक्रमण करून युद्ध सुरू केले असेल, भिती कींवा देशाअंतर्गत शस्त्रास्त्र उठाव किंवा बंडखोरा असेल तर राष्ट्रपती संपूर्ण देशासाठी आणिबाणी जाहीर करतो व संपूर्ण देशाचा कारभार आपल्या हातामध्ये घेतो. ही आणिबाणी लागू झाल्यास 1 महिन्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. संसदेनी मान्यता दिली तरच ही अणिबाणी 6 महिन्यापर्यंत लागू केली जाते. 6 महिन्यानंतर परत संसदेची मान्यता घेणे आवश्यक असते. यावेळी लोकसभेचे विसर्जन झाले असेल तर फक्त राज्यसभेची मान्यता घेतली जाते.) देशामध्ये 1962 मध्ये भारतावर चिनने हल्ला केला, तेव्हा ही आणिबाणी डॉ. सर्वेपल्ली राधाकृष्णन यांनी जाहीर केली होती. भारत-पाक युद्धाच्या वेळी 1971 मध्ये दूसऱ्यांदा राष्ट्रीय आणिबाणी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी आणी आणी तिसरी 26 जून 1975 अंतर्गत अशांततेच्या कारणावरून राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी तिसऱ्यांदा राष्ट्रीय आणिबाणी जाहीर केली.

→ परिणाम :-

1) व्यक्तीस्वातंत्र्याचा अधिकार रद्द होतो
(भाषणस्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य

२) कलम ३२ नुसार घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार जो प्राप्त झाला आहे तो ही रद्द केला जातो.
३) केंद्र सूची, राज्यसूची, समवर्ती सुचीतील कोणत्याही विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्राला प्राप्त होतो.
४) संपूर्ण देशामध्ये एकात्म शासनव्यवस्थेची निर्मीती होते.
५) केंद्रसरकार, राज्यसरकारला आदेश देतो.

इ. परिणाम राष्ट्रीय आणीबाणीशी दिसून येतात.

② प्रादेशिक आणीबाणी

संविधानाच्या कलम ३५६ नुसार एखादया घटकराज्यातील सरकार संविधानानुसार चालणे अशक्य झाल्यास किंवा त्या घटकराज्यामध्ये गोंधळ, गडबड अशांतता निर्माण झाल्यास राष्ट्रपती त्या घटकराज्यापुरती आणीबाणी जाहिर करतो. परंतू त्यासाठी त्या घटकराज्यातील राज्यपालाने राष्ट्रपतीकडे तशी लेखी सुचना करावी लागते. घटकराज्यात आणीबाणी लागू केल्यास दोन महिन्यांच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते व ती आणीबाणी १ वर्षापर्यंत लागू केली जाते. १ वर्षानंतर परत संसदेची संमती घ्यावी लागते. भारतात आजपर्यंत अनेकवेळा अनेक घटकराज्यात राष्ट्रपतीने आणीबाणी लागू केली आहे. सर्वप्रथम ३५६ व्या कलमाचा वापर १९५१ मध्ये पंजाबमध्ये करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत फक्त एक वेळा १९८० मध्ये ३५६ व्या कलमाचा वापर करून आणीबाणी लागू करण्यात आलेली होती.

Scanned with CamScanner

352
356
360

③ **आर्थिक आणीबाणी :-**

संविधानाच्या कलम 360 नुसार देशाची आर्थिक परिस्थिती ढासळली असेल आर्थिक संकट निर्माण झाल्यास राष्ट्रपती आर्थिक आणीबाणी जाहीर करतो. ही आणीबाणी जाहीर केल्यास 2 महिन्या च्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. भारताच्या सुदैवाने आतापर्यंत 1 वेळा सुद्धा ही आणीबाणी लागू केलेली नाही.

आर्थिक आणीबाणी लागू झाल्यास

→ **परिणाम :-**

1) देशातील सर्व नोकरदारांचे पगार कपात केले जातात.

2) घटकराज्यातील आर्थिक विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठवावे लागतात.

3) केंद्र आणि राज्य यांच्या आर्थिक विभाजनात परिवर्तन केले जाते.

4) आर्थिक दृष्टिकोनातून राज्याला राष्ट्रपतीद्वारे कोणताही आदेश दिला जाऊ शकतो.

**स्थान :-** 3 विविध प्रकारचे अधिकार व कार्ये भारताच्या राष्ट्रपतीला प्राप्त झालेले आहेत. हे सर्व अधिकार राष्ट्रपतीला संविधानाद्वारे देण्यात आलेले आहे. डॉ. एम. डी. शर्माच्या मते भारतीय राज्यघटनेने राष्ट्रपतीला सर्वसत्ताधीश होण्याचा मार्ग मोकळा करून दिला आहे. राष्ट्रपतीच्या नावानेच संपूर्ण देशाचा राज्यकारभार केला जातो. असे असले तरी वास्तवात भारताच्या राष्ट्रपतीचे स्थान नामामात्र स्वरूपाचे आहे. भारताने संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेचा

स्विकार केला असल्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात राष्ट्रपतीचे अधिकार पंतप्रधान वापरत असतो. पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसारच भारताचा राष्ट्रपती कार्य करतो त्यामुळे राष्ट्रपतीला रबरी शिक्का याची उपमा दिली जाते भारताच्या राष्ट्रपतीचे स्थान इंग्लंडच्या सम्राज्ञीप्रमाणे स्वर्णशुन्य आहे.

## II) उपराष्ट्रपती :-

1] प्रस्तावना :

2] भारताच्या उपराष्ट्रपती :-

भारतीय संविधानाच्या कलम 63 मध्ये उपराष्ट्रपतीच्या पदाचा उल्लेख करण्यात आला आहे. भारताने उपराष्ट्रपती पदाचा स्विकार अमेरिकेकडून केला आहे. राष्ट्रपतीचे पद रिकामे झाले किंवा त्यांच्या गैरहजेरीमध्ये राष्ट्रपती (कार्यवाहक) म्हणून कार्य करण्यासाठी उपराष्ट्रपती पदाची तरतूद करण्यात आलेली आहे. भारताच्या उपराष्ट्रपती हा राज्य सभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. परंतू तो उपराष्ट्रपती राज्यसभेचा सदस्य नसतो.

3] उपराष्ट्रपती पदाची रचना

i) पात्रता :-

1. तो भारताचा नागरीक असावा.
2. त्याचे वय 35 वर्ष पूर्ण झालेले असावे
3. राज्यसभेसाठी निवडून येण्यासाठी पात्र असावा.

④ सरकारी नोकरदार नसावा.

ii) सुचक व अनुमोदक :-

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूक अर्ज भरताना २० सुचक व २० अनुमोदकांच्या संमती ची आवश्यकता लागते.

iii) अनामत रक्कम :-

उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीसाठी 15,000 रु अनामत रक्कम भरावी लागते.

iv) निवडणूक :-

उपराष्ट्रपतीची निवडणूक एकलसंक्रमणीय गुप्त मतदान पद्धतीने जनतेतर्फे अप्रत्यक्षपणे होते. उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार संसदेच्या म्हणजेच लोकसभा व राज्यसभेच्या सर्व सदस्यांना आहे.

v) कार्यकाळ :-

उपराष्ट्रपती पदाचा कार्यकाळ ५ वर्षाचा आहे.

vi) राजीनामा व पदच्युती :-

उपराष्ट्रपतीला आपला कार्यकाळ पूर्ण होण्याअगोदर स्वइच्छेनुसार राष्ट्रपतीकडे राजीनामा देण्याचा अधिकार आहे. उपराष्ट्रपतीने गंभीर स्वरूपाचा गुन्हा केल्यास राज्यसभेमध्ये ठराव मांडून दोन्ही सभागृहामध्ये बहुमत सिद्ध झाल्यास उपराष्ट्रपतीला पदच्युती होते.

vii) शपथविधी :-

उपराष्ट्रपतीला आपले पद ग्रहण करण्यापूर्वी राष्ट्रपती पद व गोपनीयतेची शपथ देतो.

viii) वेतन व भत्ते :-

उपराष्ट्रपतीला उपराष्ट्रपती म्हणून वेतन दिले जात नाही तर राज्यसभेचा सभापती म्हणून 1 लाख 25 हजार रु मासिक वेतन व भत्ते व इतर सुख सोई दिल्या जातात.

5] उपराष्ट्रपतीचे अधिकार व कार्ये :-

i) राज्यसभेचा सभापती म्हणून अधिकार :-

उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. राज्यसभेचा अध्यक्ष या नात्याने त्याला अधिकार व कार्ये पार पाडावे लागतात.

1)- राज्यसभेच्या बैठकीचे अध्यक्ष स्थान स्विकारणे.
2) सभागृहामध्ये शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करणे
3) सभागृहामध्ये विधेयक प्रस्तुत करणे
4) विधेयकावर चर्चा घडवून आणणे.
5) सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी देणे.
6) विधेयकावर मतदान घेणे.
7) बहुमताचा निर्णय जाहीर करणे.
8) एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.
9) मंजूर झालेल्या विधेयकावर स्वाक्षरी करणे.
10) मंजूर झालेले विधेयक लोकसभेकडे किंवा राष्ट्रपतीकडे पाठविणे.

ii) गोंधळ किंवा गडबड करणाऱ्या सदस्यास अनुशासन करणे

२.

iii) कार्यवाहक राष्ट्रपती म्हणून कार्ये :-

राष्ट्रपतींच्या गैरहजेरीमध्ये किंवा राष्ट्रपतीचे पद रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती राष्ट्रपती (कार्यवाहक) म्हणून कार्ये करतात तेव्हा राष्ट्रपतीचे सर्व अधिकार आणि कार्ये उपराष्ट्रपतीला कार्यवाहक राष्ट्रपती म्हणून प्राप्त झालेले असतात.

## III) पंतप्रधान :-

1) प्रस्तावना :-

भारताने संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. संसदीय शासन व्यवस्थेमध्ये शासनाचे दोन प्रमुख असतात. एक वास्तविक व नाममात्र भारताचा राष्ट्रपती हा शासनाचा नाममात्र प्रमुख आहे तर पंतप्रधान हा वास्तविक प्रमुख आहे. पंतप्रधान पदाचा स्विकार इंग्लंडकडून करण्यात आलेला आहे. इंग्लंडमध्ये पंतप्रधानाचे पद योगायोगाने अस्तित्वात आले आहे. 1714 मध्ये हॅनोवर वंशाचा राजा जॉर्ज प्रथम इंग्लंडच्या राज्याच्या गादीवर आला. जॉर्ज प्रथमला इंग्लंडमधील चालीरिती रूढी परंपरा यांची माहिती नव्हती तसेच इंग्रजी भाषा बोलता येत नव्हती त्यामुळे तो मंत्रिमंडळाची बैठक होण्याचे टाळू लागला. हे जेव्हा मंत्र्यांना लक्षात आले तेव्हा मंत्र्यांनी आपल्यामधील एका बुद्धीमान, कर्तृत्वान व्यक्तीला म्हणजे

च रॉबर्ट वाल्पोल मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या अध्यक्षस्था-नी नेमले तेव्हापासून रॉबर्टचा उल्लेख Prime minister केला. व पंतप्रधानाचे पद इंग्लंडमध्ये अस्तित्वात आले.

भारतीय संविधानाच्या कलम ७४ नुसार राष्ट्रपतीला राज्यकारभारात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल असा उल्लेख करण्यात आला आहे.

२) पंतप्रधानाची रचना :-

i) नियुक्ती :-

पंतप्रधानाची नियुक्ती राष्ट्रपती करतो. परंतू ही नियुक्ती औपचारीक स्वरूपाची आहे. कारण लोकसभेमध्ये ज्या पक्षाला बहुमत प्राप्त झाले आहे, त्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधान म्हणून नेमले जाते. लोकसभेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्यास राष्ट्रपती स्वविवेकाधिकाराचा वापर करून लोकसभेत ज्या पक्षाला जास्त जागा आहेत त्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधानपदी नेमतो व एका विशिष्ट मुदतीमध्ये बहुमत सिद्ध करण्यास सांगितले जाते.

ii) पात्रता :-

भारतीय संविधानात पंतप्रधानाची पात्रता सांगण्यात आलेली नाही परंतू तो संसदेचा सदस्य असला पाहिजे नसल्यास ६ महिन्याच्या आत त्याने संसदेचे सदस्यत्व स्विकारले पाहिजे. उदा. १९९६ मध्ये एच. डी. देवेगौडा कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसताना पंतप्रधान झाले होते नंतर त्यांनी राज्यसभेचे

सदस्यत्व स्विकारले

iii) कार्यकाल :-

पंतप्रधानाचा कार्यकाल साधारणत: लोकसभे एवढा म्हणजेच ५ वर्षांचा आहे. मंत्रिमंडळ अल्पमतात आल्यास किंवा अविश्वासाचा ठराव संमत आल्यास पंतप्रधानास मुदतपूर्व राजीनामा द्यावा लागतो.

iv) शपथविधी :

पंतप्रधानाला राष्ट्रपतीद्वारे शपथविधी दिली जाते.

v) राजीनामा व पदच्युती :-

कार्यकाल पूर्ण होण्याआधी दर पंतप्रधानास स्वइच्छेनूसार राष्ट्रपतीकडे राजीनामा देता येतो. अविश्वासाचा ठराव संमत आल्यास पंतप्रधानास आपल्या पदावरून दूर जावे लागते.

vi) वेतन व भत्ते :-

पंतप्रधानास मासीक १ लाख रु वेतन इतर भत्ते. निःशुल्क निवास प्रवास इ. अनेक सोयी शासनाद्वारे पुरविल्या जातात.

3) पंतप्रधानाची अधिकार व कार्ये :-

i) मंत्र्याची नियूक्ती करणे :-

पंतप्रधानाची नेमणूक झाल्यास मंत्रिमंडळातील मंत्र्याची यादी तयार करून राष्ट्रपतीकडे सादर केली जाते. राष्ट्रपती औपचारिकरित्या मंत्र्याना शपथ देतो. प्रत्यक्षात पंतप्रधानालाच जात, धर्म, भाषा - भूप्रदेश इ. विचार करून मंत्र्याची

नियुक्ती करावी लागते.

ii) मंत्र्यांमध्ये खाते वाटप करणे :-

मंत्रीमंडळातील मंत्र्यांची नियुक्ती झाल्यास खाते वाटप करण्याचे कार्य ही पंतप्रधानास करावी लागते. कोणते खाते कोणत्या मंत्र्याला द्यायचे किती खाते द्यायचे तसेच मंत्री मंडळातील मंत्र्यांची संख्या ठरवण्याचा अधिकार पंतप्रधानास आहे.

iii) मंत्रीमंडळाच्या प्रमुख म्हणून कार्ये :-

पंतप्रधान हा मंत्रीमंडळाचा प्रमुख असतो. पंतप्रधान हा मंत्रीमंडळाचा आत्मा आहे. पंतप्रधानाने राजीनामा दिल्यास मंत्रीमंडळ विसर्जित होते. मंत्रिमंडळाची बैठक बोलावणे बैठकीचे अध्यक्षस्थान स्विकारणे मंत्र्यांना मार्गदर्शन करणे मंत्रीमंडळावर नियंत्रण ठेवणे इ. विविध प्रकारचे अधिकार मंत्रिमंडळाच्या प्रमुख या नात्याने पंतप्रधानास प्राप्त झाले आहे.

iv) राष्ट्रपती व मंत्रीमंडळातील दुवा :-

पंतप्रधान हा राष्ट्रपती व मंत्रीमंडळातील दुवा किंवा महत्त्वाचा आहे. प्रत्येक मंत्री राष्ट्रपतीला भेटने शक्य नाही. त्यामुळे मंत्रीमंडळाची मते, भूमिका राष्ट्रपतीपर्यंत पोहचविण्याचे काम पंतप्रधाना द्वारे केले जाते.

v) लोकसभेचा / संसदेचा नेता :-

पंतप्रधान हा लोकसभेचा नेता असतो. संसदेचे अधिवेशन बोलावणे अधिवेशनाचा कालावधी ठरवणे, लोकसभेच्या मुदतपूर्व

विसर्जनाचा राष्ट्रपतीला सल्ला देणे. कायदेमंडळात विचार लेल्या प्रश्नाचे समर्पक उत्तर देणे. इ. कार्य त्यांस करावी लागतात.

vi) बहुमतवाल्या पक्षाचा नेता :-

पंतप्रधानाला आपल्या पक्षाचे नेतृत्व ही करावे लागते. पक्षाचा नेता म्हणून पक्ष संघटना मजबूत करणे, पक्षातील आपपसातील वाद दूर करणे निवडणूकीचा कार्यक्रम तयार करणे जाहिरनामा तयार करणे, प्रचार यंत्रणा आखणे निवडणूकीसाठी फंड गोळा करणे. निवडणूकीमध्ये उमेदवार उभा करणे इ. अनेक कार्य बहुमतवाल्या पक्षाचा नेता म्हणून पंतप्रधानास करावी लागतात.

vii) राष्ट्राचा किंवा देशाचा नेता :-

संपूर्ण देशाचे नेतृत्व पंतप्रधानाकडे असते. देशाच्या विकासासाठी संरक्षणासाठी, शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी, देशामध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी पंतप्रधानास कार्य करावे लागते.

viii) नेमणूकीबाबत सल्ला देणे :-

देशातील महत्वाच्या पदावरील व्यक्तींच्या नेमणूका करण्याचा अधिकार संविधानाने राष्ट्रपतीला दिलेला असला तरी प्रत्यक्षात राष्ट्रपतीला सल्ला देण्याचे काम पंतप्रधानाद्वारेच केले जाते. मंत्री राज्यपाल, न्यायाधिश, राजदूत इ. च्या नेमणूकीबाबत पंतप्रधानाची भूमिका महत्वाची असते

ix) परराष्ट्र धोरण ठरविणे :-

पंतप्रधान हा परराष्ट्र

धोरणाचा शिल्पकार असतो. परराष्ट्र धोरण ठरविणे युद्धाची घोषणा करणे, तह-करार करणे, परराष्ट्राशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे आंतरराष्ट्रीय परिषदा बैठकी मध्ये देशाचे नेतृत्व करणे इ. कार्ये ही पंतप्रधानास पार पाडावी लागते.

४) पदव्याबाबत (पदव्या) सल्ला देणे :—

देशामध्ये विविध क्षेत्रामध्ये चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तीला गुणगौरवार्थ राष्ट्रपतीद्वारे पदव्या दिल्या जातात. राष्ट्रपतीला कोणत्या व्यक्तीला कोणती पदवी द्यावी याचा सल्ला पंतप्रधान देत असतो. भारतरत्न, कृषी मंत्री, पद्मभूषण, आदर्शशिक्षक, इ. अनेक पदव्या देताना पंतप्रधानाची भूमिका महत्वाची असते.

इ. विविध प्रकारचे अधिकार व कार्ये पंतप्रधानास पार पाडावी लागतात.

स्थान :

भारतीय राजकारणात पंतप्रधानाचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण आहे. शासनाचा वास्तविक प्रमुख म्हणून पंतप्रधानाचा उल्लेख केला जातो. संविधानाने राष्ट्रपतीला अधिकार दिलेले असले तरी व्यवहारात त्याचा वापर पंतप्रधानाद्वारे केला जातो. ज्याप्रमाणे खेळामध्ये कॅप्टनचा जसा दर्जा असतो तसे शासनामध्ये पंतप्रधानाचा असतो. तो मंत्रिमंडळाचा निर्माता, संरक्षणकर्ता जिवनदाता असल्यामुळे मंत्रिमंडळरूपी नावेचा नावाडी म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. तसेच चांदण्यातील चंद्राची उपमा ही पंतप्रधानाला दिली जाते. डॉ. आंबेडकरांच्या मते पंतप्रधान मंत्रिमंडळ रूपी कमानीची

आधारभूत महत्त्वशिला आहे. लॉर्ड मोरलेनी पंतप्रधाना ला समानात प्रथम असा दर्जा दिलेला आहे. ३. अनेक उदाहरणावरून पंतप्रधानाचे स्थान अत्यंत महत्व पूर्ण असल्याचे दिसून येते.

## प्र मंत्रीमंडळ :-

१) प्रस्तावना

संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेला मंत्रिमंडळात्मक शासनव्यवस्था या नावानेही ओळखली जाते. संविधानानुसार राष्ट्रपती हा राज्याचा प्रमुख असून नाममात्र आहे. परंतू वास्तविक सत्ता मंत्रिमंडळाच्या हातामध्ये आहे. राष्ट्रपतीला मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल असा उल्लेख संविधानाच्या कलम ७४ मध्ये करण्यात आलेला आहे. शासनामध्ये मंत्रिमंडळाची भूमिका महत्वाची असते. सरकारचे यश अपयश मंत्रिमंडळावर अवलंबून असते. भारतातील मंत्रीमंडळ इंग्लंड या मंत्रीमंडळावर आधारलेले आहे. इंग्लंडमध्ये नॉर्मन युगात मॅग्नम कौंशिलियम मध्ये क्युरियारीजीची निर्मिती करण्यात आली क्युरियारीजीचे विकसित रूप म्हणजे मंत्रिमंडळ होय. क्युरियानीशीसची संख्या वाढल्यास प्रिव्ही कौन्सीलची संख्या निर्मिती झाली. प्रिव्हीकौन्सीलची संख्या वाढली तेव्हा राजाला निर्णय घेणे अशक्य होवू लागले. त्यामुळे राजा चार्लस दुसरा यांनी प्रिव्ही कौन्सिल मधील निवडक पाच सदस्यांच्या सल्ला घेण्यास सुरुवात केली त्यामध्ये १) क्लिफोर्ड २) आर्लिंगटन ३) बंकीहम

4) ऐशले 5) लॉडरडेल या पाच सदस्यांचा समावेश होता. या पाच सदस्यांच्या नावाच्या अद्याक्षरावरून cabal हा शब्द तयार झाला. तसेच मंत्रिमंडळाची बैठक पंतप्रधानाच्या केबिन मध्ये होत असल्यामुळे त्यांच्या उल्लेख कॅबिनेट असा करण्यात येवू लागला. तेव्हापासून आजपर्यंत इंग्लंडमध्ये मंत्रिमंडळासाठी कॅबिनेट म्हणून करण्यात आला. त्याचाच स्विकार भारतात केला आहे.

2) मंत्रिमंडळाची रचना :-

i) मंत्रिमंडळाची निर्मिती :

राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार मंत्र्यांची नियुक्ती करतो. मंत्रिमंडळाची निर्मिती करताना जात, धर्म, प्रांत, भाषा, संस्कृती, लिंग, अनुभव इ. चा विचार करून मंत्र्यांची यादी पंतप्रधान तयार करतो.

ii) संख्या :-

मंत्र्यांची संख्या किती असावी संविधानामध्ये स्पष्ट करण्यात आलेले नाही. परंतू लोकसभा सदस्यांच्या 10 % सदस्य मंत्रिमंडळात असावे असा संकेत आहे. मंत्रिमंडळाची संख्या किती असावी हे ठरवण्याचा अंतिम अधिकार पंतप्रधानास असतो.

iii) पात्रता :-

मंत्रिमंडळातील मंत्री होण्यासाठी तो व्यक्ती संसदेचा सदस्य असला पाहीजे. नसल्यास 6 महिन्याच्या आत त्याने संसदेचे सदस्यत्व स्विकारले पाहीजे

iv) शपथविधी :-

मंत्रिमंडळातील मंत्र्यांना राष्ट्रपती शपथ देतो.

v) कार्यकाल :-

मंत्रिमंडळाचा कार्यकाल निश्चित नाही परंतू लोकसभेचा विश्वास असे पर्यंत मंत्री आपल्या पदाव र कार्य करतात. थोडक्यात लोकसभेच्या कार्यकालाएवढा म्हणजेच 5 वर्षांचा कार्यकाल असतो.

vi) मंत्र्याचे प्रकार :-

साधारणतः पाच प्रकारचे मंत्री असतात

1) कॅबिनेट दर्जाचे मंत्री
2) राज्यमंत्री
3) उपमंत्री
4) बिनखात्याचे मंत्री
5) संसदीय सचिव.

vii) वेतन व भत्ते :-

मंत्रिमंडळाचे वेतन व भत्ते ठरवण्याचा अधिकार संसदेला आहे मंत्र्यांना मासिक वेतन व इतर भत्ते दिले जातात, तसेच मिशुल्क निवास, प्रवास, टेली फोन इ. ही सुखसोई दिल्या जातात

viii) बैठका :

मंत्रिमंडळाची बैठक पंतप्रधानाच्या अध्यक्षते खाली आठवड्यातून कमीत कमी एक तरी बैठक बोलवली जाते. बैठकीचे कामकाज अत्यंत गुप्त असते

3) मंत्रिमंडळाचे कार्य :-

i) राष्ट्राचे धोरण निश्चित करणे :-

ii) शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करणे

iii) सार्वभौमत्व व अखंडता यांचे संरक्षण करणे

iv) कायद्यांची अंमलबजावणी करणे

v) महत्वाच्या पदावरील व्यक्तींच्या नेमणूकीबाबत सल्ला देणे

vi) अंदाजपत्रक तयार करून संसदेसमोर मांडणे

vii) महत्वाचे विधेयके संसदेमध्ये मांडणे.

viii) परराष्ट्र धोरण ठरविणे.

इ. विविध प्रकारचे अधिकार व कार्य मंत्रिमंडळाला पार पाडावी लागतात

## 4) मंत्रिमंडळाची वैशिष्ट्ये :-

Imp

i) पंतप्रधानाच्या सल्ल्याद्वारे (नुसार) राष्ट्रपतीद्वारे नेमणूक

पंतप्रधान राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार मंत्र्यांची नियुक्ती करतो. मंत्रिमंडळाची निर्मीती करताना जात, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती, लिंग अनुभव इ. चा विचार करून मंत्र्यांची यादी पंतप्रधान तयार करतात

ii) कायदेमंडळातून मंत्रिमंडळाची निर्मीती :-

भारतामध्ये कायदेमंडळातून मंत्रिमंडळाची निर्मीती केली जाते मंत्री हा कायदेमंडळाच्या कोणत्याही एका सभागृहाचा सदस्य असला पाहीजे नसल्यास सहा महिन्याच्या आत त्याने कायदेमंडळाचे सदस्यत्व प्राप्त केले पाहीजे.

Scanned with CamScanner

iii) पंतप्रधानाचे नेतृत्व :-

मंत्रिमंडळाचे पंतप्रधानाचे नेतृत्व करते. पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा आत्मा आहे. पंतप्रधानाने राजीनामा दिल्यास मंत्रिमंडळ विसर्जित होते. मंत्रिमंडळाची बैठक बोलावणे, बैठकीचे अध्यक्ष स्थान स्विकारणे, मंत्र्यांना मार्गदर्शन करणे, मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे. इ. विविध अधिकार पंतप्रधानाला कराव्या लागतात. म्हणून मंत्रिमंडळ पंतप्रधानाचे नेतृत्व करते.

iv) गुप्तता / गोपनीयता :-

गुप्तता हे एक मंत्रिमंडळाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक मंत्र्याला गोपनियतेची शपथ दिली जाते मंत्रिमंडळाच्या बैठकीत जे निर्णय घेतले जातात जी चर्चा केली जाते, त्यासंबंधी प्रत्येक मंत्र्याला गुप्तता पाळावी लागते

v) विशेषज्ञांचा समावेश :-

मंत्रिमंडळामध्ये कुशार, अनुभवी ज्ञानी, संसदेच्या सदस्याचा समावेश केला जातो अर्थशास्त्राचा अभ्यास असणाऱ्याला अर्थखाते दिले जाते. (उदा. डॉ. मनमोहन सिंग सदराचे अर्थमंत्री असताना गेटली.) मंत्रिपद देताना संबंधीत खात्याचे ज्ञान त्या सदस्याला आहे का याचा विचार करूनच खाते दिले जाते

vi) राष्ट्रपतीला मंत्रिमंडळामध्ये स्थान नाही :-

राष्ट्रपतीला

देशाचा घटनात्मक प्रमुख किंवा मंत्रिमंडळाचा निर्माता असला तरी मंत्रिमंडळामध्ये राष्ट्रपतीला कोणतेही स्थान नाही. मंत्रिमंडळाचा प्रमुख पंतप्रधान असतो त्यामुळे पंतप्रधानाचे स्थान मंत्रिमंडळामध्ये प्रभावी असते.

vii) राजकीय एकजिनसीपणा :-

मंत्रिमंडळामध्ये लोकसभेमध्ये ज्या पक्षाला बहुमत आहे. त्या पक्षाच्या सदस्यांचा समावेश केला जातो. एकपक्षीय मंत्रिमंडळाची निर्मिती झाल्यामुळे त्यांच्यात एकात्मता निर्माण होते. त्यातून राजकीय एकजिनसीपणा दिसून येतो. परंतू मंत्रिमंडळामध्ये एकाच पक्षाचे सदस्य असावेत असा नियम नाही. संमिश्र सरकारमध्ये वेगवेगळ्या पक्षाचे सदस्य मंत्रिमंडळात असले तरी त्यांच्यातही राजकीय एकजिनसीपणा दिसून येतो.

viii) सामुहिक जबाबदारी :-

सामुहिक जबाबदारी हे मंत्रिमंडळाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य होय. मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्री वयक्तीक रित्या तर संसदेला जबाबदार असतातच. पण त्याचबरोबर सामूहिक रित्या ने लोकसभेला जबाबदार असतात. असे संविधानाच्या कलम 75 (3) मध्ये नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक मंत्री आपल्या कार्यासंबंधी लोकसभेला खात्याच्या प्रमुख म्हणून वयक्तीक व मंत्रिमंडळाचा सदस्य म्हणून सामूहीक अशा दोन्ही पद्धतीने जबाबदार असतो.

सामूहिक जबाबदारी म्हणजे मंत्र्याने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाची संपूर्ण जबाबदारी सर्व मंत्र्यांनी स्विकारणे होय. एका मंत्र्याची चूक ही सर्व मंत्र्यांची चूक मांडली जाते. सर्वजन एकासाठी व एकजन सर्वांसाठी

जबाबदार समजला जातो. सरकारमधील विविध खाते वेगवेगळ्या मंत्र्यात विभागली गेली असली तरी ते सर्व जन एक संस्था म्हणून सामूहिक जबाबदार असतात. यामुळे संपूर्ण मंत्रिमंडळ एकतेच्या रूपामध्ये कार्य करतात सर्व मंत्री एकदुसऱ्याचे निर्णय, कार्य, उत्तरदायी असतात.

अधिवेशनाच्या काळात मंत्र्याला प्रश्न उपप्रश्न विचारण्याचा अधिकार संसद सदस्याला आहे. विचारले त्या प्रश्नाचे उत्तर देणे मंत्र्यावर बंधनकारक आहे. एखादया मंत्र्याच्या चुकीला सर्वजन सामूहिक रित्या जबाबदार असतात. म्हणून प्रत्येक मंत्री आपआपल्या खात्याचे धोरण ठरविताना इतर मंत्र्यांना विश्वासात घेतात. यासंदर्भात लॉर्ड मोरले यांनी असे मत मांडले की, मंत्रिमंडळातील सर्व सदस्य एकदाच पोहतात व सर्वजण एकदाच बुडतात. थोडक्यात सामूहिक जबाबदारी मधून मंत्रिमंडळामध्ये एकात्मता किंवा संघटन दिसून येतो.

Scanned with CamScanner